ePaper
**अमेरिका-इराण शांतता कराराचे उल्लंघन, इस्रायलचा लेबनॉनवर हल्ला**

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™






नाले बुजवून कमावला नफा, आता पालिकेचा दणका

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 16 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मोदींचे पंतप्रधान रोबर्ट फिको यांना भारत भेटीचे निमंत्रण

# भारत आणि स्लोव्हाकियात ऐतिहासिक करार

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्लोव्हाकिया दौऱ्यादरम्यान भारत आणि स्लोव्हाकिया यांनी द्विपक्षीय संबंधांना नवे बळ देत 'कॉम्प्रिहेन्सिव्ह पार्टनरशिप' अर्थात सर्वसमावेशक भागीदारीची घोषणा केली आहे. १९९३ मध्ये स्लोव्हाकिया स्वतंत्र राष्ट्र झाल्यानंतर एखाद्या भारतीय पंतप्रधानांची ही पहिलीच अधिकृत भेट ठरली असून, या दौऱ्याकडे दोन्ही देशांच्या संबंधांमधील ऐतिहासिक टप्पा म्हणून पाहिले जात आहे.**

स्लोव्हाकियाची राजधानी ब्रातिस्लाव्हा येथे पंतप्रधान मोदी यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. ऐतिहासिक ब्रातिस्लाव्हा कॅसल येथे झालेल्या स्वागत समारंभानंतर पंतप्रधान मोदी आणि स्लोव्हाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांच्यात उच्चस्तरीय द्विपक्षीय चर्चा झाली. दोन्ही नेत्यांनी व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, सुरक्षा, विज्ञान-तंत्रज्ञान, अंतराळ, अणुऊर्जा, शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रांतील सहकार्य अधिक दृढ करण्याबाबत सविस्तर चर्चा केली.

संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "भारत आणि स्लोव्हाकिया यांच्यातील मैत्री विश्वास, लोकशाही मूल्ये आणि परस्पर सहकार्यावर आधारित आहे. आज आम्ही संबंधांना 'कॉम्प्रिहेन्सिव्ह पार्टनरशिप'चा दर्जा देत आहोत. हा दोन्ही देशांसाठी 'विन-विन' निर्णय असून भविष्यातील सहकार्याची नवी दारे उघडणारा ठरेल.

या दौऱ्यात डिजिटल तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, पोस्ट-क्वांटम तंत्रज्ञान, वैज्ञानिक संशोधन, अणुऊर्जा आणि ऑडिओ-व्हिज्युअल निर्मिती क्षेत्रांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण करार आणि सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. तसेच दोन्ही देशांतील कुशल कामगार, तंत्रज्ञ आणि व्यावसायिकांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष सहकार्य करण्याचे ठरविण्यात आले. सामाजिक सुरक्षा करारालाही लवकरच अंतिम स्वरूप दिले जाईल, अशी माहिती मोदी यांनी दिली.

बैठकीत दोन्ही नेत्यांनी जागतिक घडामोडींवरही चर्चा केली. संयुक्त राष्ट्र संघातील सुधारणांची आवश्यकता, आंतरराष्ट्रीय सुरक्षेची आव्हाने, प्रादेशिक संघर्ष आणि जागतिक शांतता या विषयांवर विचारविनिमय झाला. सर्व मतभेद आणि तणाव संवाद व शांततापूर्ण मार्गाने सोडवावेत, यावर दोन्ही देशांचे एकमत असल्याचे मोदी यांनी स्पष्ट केले.

स्लोव्हाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांनी भारत-युरोपीय युनियन मुक्त व्यापार कराराचे विशेष स्वागत केले. हा करार आर्थिक सहकार्याला चालना देणारा आणि दोन्ही बाजूंसाठी फायदेशीर ठरणारा असल्याचे त्यांनी नमूद केले. या कराराच्या अंमलबजावणीसाठी स्लोव्हाकिया पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

यावेळी पंतप्रधान मोदी यांनी रॉबर्ट फिको यांना भारत भेटीचे निमंत्रण दिले. फिको यांनी हे निमंत्रण स्वीकारत भारताला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. त्यामुळे आगामी काळात दोन्ही देशांमधील राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध आणखी मजबूत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, स्लोव्हाकिया दौऱ्यापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी फ्रान्समधील नीस येथे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली होती. तसेच 'भारत इनोव्हेट्स' उपक्रमाचे उद्घाटनही त्यांनी केले. स्लोव्हाकिया दौरा पूर्ण केल्यानंतर मोदी पुन्हा फ्रान्सला रवाना होणार असून, १६ आणि १७ जून रोजी इव्हियन येथे होणाऱ्या जी-७ शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. या परिषदेत जागतिक अर्थव्यवस्था, हवामान बदल, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे. भारत आणि स्लोव्हाकिया यांच्यातील वाढते सहकार्य हे केवळ द्विपक्षीय संबंधांसाठीच नव्हे, तर भारत आणि युरोपमधील व्यापक धोरणात्मक भागीदारीसाठीही महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. त्यामुळे या दौऱ्याकडे आंतरराष्ट्रीय राजनैतिक वर्तुळात विशेष लक्ष लागले आहे.





### ऐतिहासिक स्वागत आणि द्विपक्षीय चर्चा

ब्रातिस्लाव्हा कॅसल येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. त्यानंतर मोदी आणि स्लोव्हाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली. दोन्ही देशांनी संबंधांना 'कॉम्प्रिहेन्सिव्ह पार्टनरशिप'चा दर्जा देत व्यापार, तंत्रज्ञान, संरक्षण आणि गुंतवणूक क्षेत्रातील सहकार्य वाढविण्याचा निर्धार व्यक्त केला. हा निर्णय भारत-स्लोव्हाकिया मैत्रीतील ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे.

### सहकार्याची नवी क्षेत्रे आणि स्वाक्षरी झालेले करार

दोन्ही देशांच्या प्रमुखांनी व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, सुरक्षा, तंत्रज्ञान, अंतराळ, अणुऊर्जा, शिक्षण आणि संस्कृती यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यावर चर्चा केली. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी या बैठकीतील महत्त्वाच्या करारांची माहिती दिली. डिजिटल तंत्रज्ञान आणि सायबर सुरक्षा, पोस्ट-क्वांटम तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक सहकार्य, अणुऊर्जा आणि ऑडिओ-व्हिज्युअल निर्मिती या क्षेत्रांत दोन्ही देशांमध्ये करार आणि सामंजस्य करार झाले आहेत. कुशल कामगार आणि व्यावसायिकांना दोन्ही देशांत रोजगाराच्या संधी सुलभ करण्यासाठी या करारावर स्वाक्षरी करण्यात आली. याशिवाय, लवकरच 'सामाजिक सुरक्षा' करारालाही अंतिम रूप दिले जाईल, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

### फ्रान्स आणि जी-७ शिखर परिषद

स्लोव्हाकियाला येण्यापूर्वी पंतप्रधान मोदी शनिवारी फ्रान्समधील नीस येथे दाखल झाले होते, जिथे त्यांनी राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्याशी चर्चा केली आणि 'भारत इनोव्हेट्स'चे उद्घाटन केले. स्लोव्हाकियाचा दौरा आटोपून पंतप्रधान मोदी मंगळवारी पुन्हा फ्रान्सला रवाना होतील, जेथे ते १६ आणि १७ जून रोजी इव्हियन येथे होणाऱ्या 'जी-७'शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत.

# रिंग रोडच्या नियोजनाचा खेळखंडोबा!

## रस्ते विकास महामंडळाकडून ११७ गावं पुन्हा 'पीएमआरडीए'कडे

महाईन्यूज । पुणे

**शहरालगतच्या वर्तुळाकार रस्त्यासाठी (रिंग रोड) नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे (एमएसआरडीसी) दिलेली ११७ गावे पुन्हा 'पीएमआरडीए'कडे देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. 'पीएमआरडीए'ने यापूर्वीच या गावांचा प्रारूप विकास आराखडा तयार केला होता. ती रस्ते महामंडळाकडे गेल्यानंतर पुन्हा नव्याने विकास आराखड्याचा इरादा जाहीर करण्यात आला आणि आता पुन्हा 'पीएमआरडीए'लाच या गावांचा संरचनात्मक आराखडा (स्ट्रक्चरल प्लॅन) करावा लागणार आहे. त्यामुळे सरकारने या गावांच्या नियोजनाचा खेळखंडोबा मांडल्याची भावना स्थानिक ग्रामस्थांतून व्यक्त केली जात आहे.**



'एमएसआरडीसी'कडून १३७ किलोमीटरचा लांबीचा रिंग रोड तयार करण्यात येत आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी (सन २०२४) राज्य सरकारने रिंग रोडलगतच्या पाच तालुक्यांतील ११७ गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून 'एमएसआरडीसी'ची नियुक्ती केली. ही गावे आपल्या हद्दीतील असल्याने या गावांचा प्रारूप विकास आराखडा 'पीएमआरडीए'ने तयार केला होता. त्यानुसार रिंग रोडलगत दोन विकास केंद्रे प्रस्तावित करण्यात आली होती, तीदेखील 'एमएसआरडीसी'नेच विकसित करावीत, असे सरकारने ठरवले. या ११७ गावांतील ६६८ चौरस किलोमीटर क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून 'एमएसआरडीसी' काम पाहील, असे स्पष्ट करण्यात आले. त्यानंतर 'एमएसआरडीसी'ने या गावांचा विकास आराखडा करण्यासाठीचा इरादा जाहीर केला.

आता पुन्हा ही गावे स्ट्रक्चरल प्लॅन करण्यासाठी पुन्हा 'पीएमआरडीए'कडे सोपवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे या गावांच्या विकासाबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिसूचित क्षेत्रात यापूर्वी समाविष्ट असलेल्या हवेली, भोर, पुरंदर, मुळशी, वेल्हे या तालुक्यांतील ही गावे आहेत. त्यांच्यासाठी १० ऑक्टोबर २०२४च्या सरकारी अधिसूचनेद्वारे 'एमएसआरडीसी'ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली गेली. मात्र, या गावांचे क्षेत्र प्राधिकरणाच्या क्षेत्राशी संलग्न असून, भौगोलिक दृष्ट्या 'पीएमआरडीए'च्या अधिसूचित क्षेत्राने वेढलेले आहे.

### बैठकीत काय सांगितलं?

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना सुधारित अधिनियमानुसार 'पीएमआरडीए'नेच या गावांचा संरचनात्मक आराखडा तयार करणे अपेक्षित आहे. त्यामुळे एकसंध, एकात्मीकृत व एकसमान नियोजन साध्य करण्यासाठी व विकास प्रक्रियेचे सुलभीकरण होण्यासाठी या गावांसाठी 'पीएमआरडीए'ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करणे आवश्यक आहे. त्याबाबतचा प्रस्ताव सरकार मान्यतेसाठी सादर करावा. या क्षेत्रासाठीचा संरचनात्मक आराखडा झाल्यानंतर गरजेनुसार त्यातील काही क्षेत्र 'एमएसआरडीसी'कडे विशेष नियोजन प्रकल्पासाठी देता येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राधिकरणाच्या बैठकीत सांगितले.

# पुनर्बांधणीच्या कामांदरम्यान पुणे विमानतळ सुरू राहणार

महाईन्यूज । पुणे

**भारतीय हवाई दलाच्या अंतर्गत असलेली देशातील जोधपूर, श्रीनगर, आदमपूर आणि पुणे विमानतळ येत्या वर्षांत धावपट्टी दुरुस्ती व पुनर्बांधणीच्या कामांसाठी काही दिवस बंद केली जाणार होती. मात्र, पुणेकरांसाठी दिलासादायक बाब म्हणजे पुणे विमानतळ आता बंद केले जाणार नाही. धावपट्टीच्या देखभालीसाठी विमानतळ बंद असलेल्या सकाळच्या दोन तासांमध्येच आवश्यक दुरुस्तीची कामे पूर्ण केली जाणार आहेत.**




भारतीय हवाई दलाकडून लष्करी विमानतळाची धावपट्टी दुरुस्ती ही उड्डाण सुरक्षितता आणि कार्यक्षमता राखण्यासाठी अत्यावश्यक असल्याने धावपट्टी डागडुजी व नूतनीकरणाचे काम केले जाते. या वर्षांत चार विमानतळांचे हे काम करण्याचे नियोजन होते. त्यानुसार जोधपूर विमानतळाचे काम मार्च व एप्रिल महिन्यात करण्यात आले; तर, श्रीनगर विमानतळ ऑगस्ट महिन्यात बंद केले जाणार आहे. नोव्हेंबरमध्ये आदमपूर विमानतळ कामकाजासाठी बंद करण्याचे नियोजन आहे. मात्र, आतापर्यंत पुणे विमानतळ कधी बंद केले जाणार याचे वेळापत्रक जाहीर केलेले नव्हते. यावर पुणे विमानतळाच्या अधिकाऱ्यांनी धावपट्टी व इतर कामांसाठी विमानतळ बंद राहणार नसल्याचे स्पष्ट केले.

'पुणे विमानतळावरून दर रोज सुमारे २०० विमानांची ये-जा होते. विमानतळ बंद केल्यास प्रवाशांना फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे विमानतळ प्रशासनाने भारतीय हवाई दलाकडे कामासाठी सकाळी विमानतळ बंद असलेल्या दोन तासांच्या वेळात हे काम करण्याची विनंती करण्यात आली होती. हवाई दलाने दोन तासांत काम पूर्ण करण्यास मान्यता दिली आहे. पुणे विमानतळाच्या जुन्या टर्मिनलचे काम पूर्ण झाले आहे. सुरक्षा विषयक उपकरणे बसवण्याचे काम शिल्लक आहे. त्यानंतर सुरक्षा विषयक तपासणी केली जाईल. त्यानंतर जुने टर्मिनल प्रवाशांसाठी खुले केले जाणार आहे, असे पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके म्हणाले.

'पुणे विमानतळावर विमानाला बर्ड हिटच्या घटना रोखण्यासाठी भारतीय हवाई दलाकडून उपाययोजना करण्यात आल्या आहेत. धावपट्टी परिसरात गवत कापून स्वच्छता करण्यात - आली. पक्ष्यांना धावपट्टीपासून दूर ठेवण्यासाठी आवश्यक यंत्रणा लावण्यात आल्या आहेत,' अशी माहिती संतोष ढोके यांनी दिली.

### वाहनांना पाचशे रुपये दंड

पुणे विमानतळाच्या आगमन प्रवेशद्वाराजवळ प्रवाशांना घेण्यासाठी आल्यानंतर अनेक वाहने १५ मिनिटांपेक्षा जास्त वेळउभी राहण्यास परवानगी नाही; पण अनेक वाहने अर्धा तासांपर्यंत तिथे थांबतात. अशा वाहनांना नियमांप्रमाणे पाचशे रुपये दंड करण्याचे नियोजन आहे.

# पिंपरी-चिंचवड एसआरए घोटाळा तापला

## टीडीआर गैरव्यवहार, दुबार लाभार्थी आणि नियमबाह्य मंजुरीच्या आरोपांवर एसआरएचा खुलासा


**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) विविध योजनांमधील कथित घोटाळे आणि अनियमितता पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. या प्रकरणातील गैरव्यवहार उघडकीस आल्यानंतर त्यांच्या चौकशीला योग्य दिशा देण्याऐवजी एसआरए प्रशासनाकडून संबंधित अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम सुरू असल्याचा आरोप होत आहे. टीडीआर घोटाळे, नियमबाह्य मंजुरी, दुबार लाभार्थी आणि सरकारी जागांवरील संशयास्पद पुनर्वसन योजनांबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांना एसआरएने दिलेल्या खुलाशात थेट उत्तरे टाळल्याची टीका केली जात आहे.**

पिंपरी-चिंचवडमधील मिलिंदनगर, विठ्ठलनगर-नेहरूनगर आणि पिंपरी सॅनिटरी चाळ या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये हजारो कोटी रुपयांच्या टीडीआर गैरव्यवहारांचे आरोप करण्यात आले आहेत. या सर्व योजनांमध्ये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश गटणे यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा दावा करण्यात येत आहे. काही विशिष्ट विकसकांना लाभ मिळावा यासाठी नियम धाब्यावर बसवण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

झोपडपट्टी पुनर्वसनाच्या नावाखाली बीएसयूपी योजनेतील लाभार्थ्यांना पुन्हा पात्र ठरविणे, सरकारी जागांवर झोपडपट्टी नसतानाही झोपडपट्टी दाखवून योजना मंजूर करणे, तसेच पुनर्वसनाच्या निकषांमध्ये कथित फेरफार करणे अशा अनेक बाबी समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर दोषी अधिकारी आणि संबंधित विकसकांवर कारवाईची मागणी होत असताना एसआरए प्रशासनाने कोणत्याही योजनेत घोटाळा झालेला नसल्याचा दावा केला आहे.

दरम्यान, एसआरएचे विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी सतीशकुमार खडके यांनी संबंधित योजनांबाबत खुलासा करत कोणत्याही योजनेत घोटाळा अथवा गैरव्यवहार झालेला नसल्याचा दावा केला आहे. मात्र, योजनांमधील टीडीआर मंजुरी, दुबार लाभार्थी, सरकारी जागांवरील पुनर्वसन आणि नियमबाह्य मंजुरीसंदर्भातील अनेक प्रश्नांना थेट उत्तर देण्यात आले नसल्याची टीका करण्यात येत आहे. त्यामुळे एसआरए प्रशासन संबंधित अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप होत आहे.



### एसआरए प्रकरणातील वादग्रस्त मुद्दे

पिंपरी-चिंचवडमधील काही झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. मिलिंदनगर योजनेत बीएसयूपीअंतर्गत घरे मिळालेल्या लाभार्थ्यांच्या जागेवर पुन्हा पुनर्वसन योजना राबविण्यात आल्याचा दावा आहे. पिंपरीतील सॅनिटरी चाळ परिसरात झोपडपट्टी नसतानाही झोपडपट्टी दाखवून योजना मंजूर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच विठ्ठलनगर-नेहरूनगर योजनेत बीएसयूपी लाभार्थ्यांना पुन्हा पात्र ठरविल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. या सर्व प्रकरणांमध्ये तत्कालीन सीईओ नीलेश गटणे यांच्या कार्यकाळातील निर्णयांची चौकशी करण्याची मागणी होत असून, विद्यमान सीईओ सतीशकुमार खडके यांनी कोणताही गैरव्यवहार झाला नसल्याचा दावा केला आहे. मात्र, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### मिलिंदनगर योजनेतील प्रश्न कायम

मिलिंदनगर सर्व्हे क्रमांक १४ येथील जागेवर यापूर्वीच बीएसयूपी योजनेअंतर्गत झोपडपट्टीधारकांना घरे देण्यात आली होती. असे असताना त्याच ठिकाणी दुसरी पुनर्वसन योजना राबविण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रक्रियेसाठी महापालिकेची आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) घेण्यात आलेली नसल्याचे सांगितले जात आहे. तसेच यापूर्वीच्या विकसकाचा प्रस्ताव अधिकृतरीत्या दफ्तरी दाखल करण्यात आला नसतानाही पुढील प्रक्रिया झाल्याचे आरोप आहेत.

# नाले बुजवून कमावला नफा, आता पालिकेचा दणका; ५० कंपन्या रडारवर

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**भोसरी औद्योगिक क्षेत्रातील (एमआयडीसी) नैसर्गिक नाल्यांवर ५० हून अधिक कंपनी मालकांनी केलेल्या कथित अतिक्रमणांवर अखेर पिंपरी-चिंचवड महापालिकेने कारवाईचा बडगा उगारला आहे. संबंधित कंपन्यांना नोटिसा बजावत तातडीने अतिक्रमणे हटविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अतिक्रमणे स्वतःहून न काढल्यास महापालिकेकडून थेट तोडक कारवाई करून त्याचा खर्च संबंधित कंपन्यांकडून वसूल केला जाणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.**

भोसरी एमआयडीसी परिसरातून पावसाचे पाणी वाहून नेणारे अनेक नैसर्गिक नाले आहेत. मात्र, गेल्या काही वर्षांत काही उद्योजकांनी जागेचा विस्तार करण्यासाठी या नाल्यांवर अतिक्रमणे केल्याचे समोर आले आहे. काही ठिकाणी राडारोडा टाकून नाले बुजविण्यात आले, तर काही ठिकाणी नाल्यांच्या पात्रातच भिंती, शेड आणि इमारतींची उभारणी करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह अडवल्यामुळे पावसाचे पाणी साचून राहत असून, त्याचा फटका संपूर्ण औद्योगिक क्षेत्राला बसत आहे. टी-ब्लॉक, डब्ल्यू-ब्लॉकसह अनेक सखल भागांमध्ये दरवर्षी पूरसदृश परिस्थिती निर्माण होत आहे. पावसाचे पाणी रस्ते आणि कंपन्यांच्या आवारात शिरत असल्याने कोट्यवधी रुपयांच्या कच्च्या व तयार मालाचे नुकसान होत आहे. तसेच कामगारांना गुडघाभर पाण्यातून प्रवास करावा लागत असल्याने अपघातांचा धोका वाढत आहे.

पाणी दीर्घकाळ साचून राहत असल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढून आरोग्याच्या समस्या निर्माण होत असल्याची तक्रारही नागरिक आणि उद्योजकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे अतिक्रमणांविरोधातील कारवाईची मागणी सातत्याने होत होती.



### नाले बुजले; उद्योगनगरीला फटका

भोसरी एमआयडीसीतील नैसर्गिक नाल्यांवर झालेल्या अतिक्रमणांमुळे दरवर्षी पावसाळ्यात टी-ब्लॉक, डब्ल्यू-ब्लॉकसह अनेक भाग जलमय होत आहेत. नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह रोखल्याने पावसाचे पाणी रस्ते, कंपन्या आणि सखल भागांत शिरते. परिणामी कोट्यवधी रुपयांच्या मालाचे नुकसान, वाहतुकीत अडथळे, कामगारांचे हाल आणि डासांच्या प्रादुर्भावासह आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेने ५० हून अधिक कंपन्यांना नोटिसा बजावत अतिक्रमणे हटविण्याचे आदेश दिले असून, कारवाईचा खर्चही संबंधित कंपन्यांकडून वसूल करण्यात येणार आहे.



## भूमिका

# अधिकारी बदलले तरच व्यवस्था बदलेल!



**सरकारच्या योजना कितीही चांगल्या असल्या, निर्णय कितीही लोकाभिमुख असले, तरी त्यांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा संवेदनशील, जबाबदार आणि कार्यक्षम नसेल तर त्या योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत नाही. उलट जनतेच्या मनात सरकारविषयी नाराजी निर्माण होते.**

याचे सकारात्मक उदाहरण अनेक ठिकाणी पाहायला मिळते. एखाद्या कार्यालयातील अधिकारी जनतेशी आदराने वागत असेल, त्यांच्या अडचणी समजून घेत असेल आणि प्रलंबित कामांवर नियमित लक्ष ठेवत असेल, तर संपूर्ण कार्यालयीन वातावरण बदलते. वरिष्ठ अधिकाऱ्यांची कार्यसंस्कृती खालच्या स्तरापर्यंत पोहोचते आणि नागरिकांनाही त्याचा फायदा होतो. प्रशासनातील अशा संवेदनशील अधिकाऱ्यांमुळे शासनावरील विश्वास अधिक दृढ होतो.

मात्र, दुसरीकडे काही अधिकारी सरकारच्या प्रतिमेला धक्का पोहोचविण्याचे काम करतात. शासनाने एखाद्या गरजू कुटुंबासाठी तातडीने मदत जाहीर केली, तरी त्याची अंमलबजावणी निष्काळजीपणे झाल्यास बदनामी सरकारची होते. निर्णय चांगला असतो; पण त्याची अंमलबजावणी चुकीची होते. त्यामुळे जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. अन्यथा प्रशासनात उत्तरदायित्व निर्माण होत नाही. सामान्य नागरिकांचा शासनाशी संपर्क प्रामुख्याने जिल्हाधिकारी कार्यालय, महापालिका, महसूल विभाग, सेतू सुविधा केंद्र, रेशन दुकान किंवा वीज कार्यालयापुरताच मर्यादित असतो. येथे नागरिकांना वेळेत आणि सुलभ सेवा मिळणे अपेक्षित असते. प्रत्यक्षात मात्र दाखले, परवाने, नोंदी, जमीनविषयक कामे किंवा विविध मंजुऱ्यांसाठी नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. ऑनलाइन सुविधा सुरू करण्यात आल्या असल्या तरी अनेकदा संकेतस्थळे बंद असतात किंवा योग्य प्रकारे कार्यरत नसतात. परिणामी, डिजिटल प्रशासनाची संकल्पना केवळ कागदावरच राहते.

याहून गंभीर बाब म्हणजे काही ठिकाणी कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी अनधिकृत मार्गांचा अवलंब केला जातो, अशी चर्चा कायम असते. फाइल लवकर हलविणे, परवानग्या मिळविणे किंवा विविध प्रस्ताव मंजूर करून घेण्यासाठी मध्यस्थांची गरज भासते, ही परिस्थिती कोणत्याही लोकशाही व्यवस्थेसाठी चिंताजनक आहे. प्रशासनातील पारदर्शकता आणि जबाबदारी वाढविण्याची गरज आज पूर्वीपेक्षा अधिक आहे.

महसूल विभागाने जाहीर केलेला 'व्हर्टिकल सातबारा' हा उपक्रम नागरिकांसाठी उपयुक्त ठरू शकतो. मात्र, कोणत्याही नव्या योजनेचे यश तिच्या प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून असते. प्रलंबित प्रकरणांचा आढावा, वेळेवर निर्णय आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर याशिवाय कोणतीही सुधारणा यशस्वी होऊ शकत नाही.

शासन आणि जनता यांच्यातील सर्वात महत्त्वाचा दुवा म्हणजे प्रशासन. हा दुवा सक्षम, प्रामाणिक आणि संवेदनशील असेल तर शासनावरील विश्वास वाढतो. अन्यथा कितीही चांगल्या योजना आणल्या, तरी त्यांचा अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. त्यामुळे व्यवस्था बदलायची असेल, तर केवळ धोरणे बदलून चालणार नाही; ती राबविणाऱ्या अधिकाऱ्यांची कार्यसंस्कृती बदलणे अधिक महत्त्वाचे आहे.

## प्रासंगिक »

### संस्कारीत मुलेच यशस्वी

**एका शिक्षकाने विद्यार्थ्यांसाठी चॉकलेट्स आणली होती. सर्व मुलांना रांगेत बसवून ते चॉकलेट्स वाटणार इतक्यात प्राचार्यांनी त्यांना तातडीने कार्यालयात बोलावले.**

जाताना शिक्षक म्हणाले, “मी परत येईपर्यंत वाट पाहा. हवे तर तुम्ही स्वतःही चॉकलेट्स घेऊ शकता.” शिक्षक गेल्यावर काही मुलांनी लगेच चॉकलेट्स घेतली व खाल्ली. मात्र काही मुलांनी संयम ठेवून शिक्षकांची वाट पाहिली.

थोड्या वेळाने शिक्षक परत आले. त्यांनी ज्यांनी स्वतः चॉकलेट्स घेतली होती त्यांना विचारले आणि नंतर वाट पाहणाऱ्या मुलांना स्वतःच्या हाताने चॉकलेट्स दिली. अनेक वर्षांनी शिक्षकांनी त्या विद्यार्थ्यांची माहिती घेतली. त्यांना आढळले की संयम, शिस्त आणि शिक्षकांचा आदर जपणारी मुले जीवनात उच्च पदांवर पोहोचली होती, तर उतावळेपणा करणारी मुले सामान्य आयुष्य जगत होती.

- तात्पर्य : संस्कार, संयम, शिस्त आणि योग्य संधीची वाट पाहण्याची वृत्ती माणसाला यशाच्या शिखरावर पोहोचवते. उतावळेपणा व चुकीचे निर्णय प्रगतीचा मार्ग अडवू शकतात.

इलॉन मस्क यांची वाढती आर्थिक ताकद आणि त्यांच्या कंपन्यांचे प्रचंड बाजारमूल्य यामुळे जगभरात पुन्हा एकदा मक्तेदारीच्या धोक्याविषयी चर्चा सुरू झाली आहे. उद्यमशीलता, नवकल्पना आणि संपत्ती निर्मिती यांचे स्वागत केले पाहिजे, यात दुमत नाही.

# मक्तेदारीचा धोका आणि व्यवस्थेची जबाबदारी

मात्र, एखादी व्यक्ती किंवा कंपनी इतकी प्रभावशाली होऊ लागते की ती बाजारपेठ, राजकारण आणि धोरणांवर प्रभाव टाकू लागते, तेव्हा लोकशाही व्यवस्थेसमोर गंभीर प्रश्न उभे राहतात.

भांडवलशाहीचा पाया हा स्पर्धेवर आधारित आहे. स्पर्धेमुळे ग्राहकांना चांगल्या सेवा मिळतात, उद्योगांमध्ये नावीन्य निर्माण होते आणि अर्थव्यवस्थेची गती वाढते. परंतु स्पर्धेऐवजी मक्तेदारी निर्माण झाली तर संपूर्ण व्यवस्थेचे संतुलन बिघडू शकते. एखाद्या कंपनीकडे प्रचंड आर्थिक, तांत्रिक आणि राजकीय ताकद एकवटली की इतर स्पर्धकांना संधी मिळणे कठीण होते.



याच धोक्याची जाणीव अमेरिकेने शंभराहून अधिक वर्षांपूर्वी केली होती. जॉन डी. रॉकफेलर यांच्या 'स्टँडर्ड ऑइल' कंपनीची वाढ इतकी प्रचंड झाली होती की ती संपूर्ण तेल उद्योगावर नियंत्रण मिळवू लागली. त्यावेळी अमेरिकी व्यवस्थेने 'शर्मन अँटी ट्रस्ट' कायद्याच्या माध्यमातून ही मक्तेदारी मोडून काढली. त्यानंतर दूरसंचार, तंत्रज्ञान आणि इतर क्षेत्रांतील अनेक कंपन्यांवरही नियंत्रण ठेवण्यात आले. यामागचा उद्देश उद्योगांना रोखणे नव्हता, तर मुक्त स्पर्धा जिवंत ठेवणे हा होता.

आजच्या काळात तंत्रज्ञान कंपन्यांचा प्रभाव अभूतपूर्व वाढला आहे. समाजमाध्यमे, कृत्रिम बुद्धिमत्ता, अवकाश संशोधन, वाहतूक आणि ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांमध्ये काही मोजक्या कंपन्यांचे वर्चस्व निर्माण होत आहे. त्यामुळे आर्थिक शक्तीबरोबरच माहिती आणि प्रभावाची ताकदही काही हातांत केंद्रीत होत आहे. ही बाब कोणत्याही लोकशाहीसाठी चिंतेची ठरू शकते.

भारतातही यासंदर्भात सावध राहण्याची गरज आहे. मोठ्या उद्योगसमूहांची वाढ अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक असली, तरी त्याचवेळी निष्पक्ष स्पर्धा, पारदर्शक धोरणे आणि प्रभावी नियमन यांनाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. अन्यथा काही मोजक्या उद्योगसमूहांच्या हातात संसाधने, पायाभूत सुविधा आणि बाजारपेठेचे नियंत्रण जाण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

उद्योगांची वाढ आणि मक्तेदारी यामधील सूक्ष्म सीमारेषा ओळखणे हे कोणत्याही सक्षम व्यवस्थेचे कर्तव्य आहे. आर्थिक प्रगतीबरोबरच स्पर्धात्मक वातावरण टिकवून ठेवणे आणि कोणालाही अमर्याद वर्चस्व मिळू न देणे हीच लोकशाही अर्थव्यवस्थेची खरी कसोटी ठरते.

## ।। अभंगवाणी ।।



विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा ।
करी पापा निर्मूळ ।।

भाग्यवंता छंद मनी ।
कोड कानीं ऐकती ।।१।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# एसटी महामंडळाचा प्रवाशांना मोठा झटका

## १० टक्के भाडेवाढ आता ‘या’ तारखेपर्यंत लागू राहणार, जाणून घ्या नवे दर

**महाईन्यूज । मुंबई**

**वाढत्या डिझेल दरांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने प्रवाशांना पुन्हा एकदा झटका दिला आहे. सध्या बससेवांसाठी लागू करण्यात आलेल्या १० टक्के हंगामी भाडेवाढीस आणखी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली असून वाढीव भाडेदर आता १५ जुलै मध्यरात्रीपर्यंत कायम राहणार आहेत.**



उन्हाळी गर्दीच्या पार्श्वभूमीवर महसूलवाढीसाठी १५ एप्रिलपासून लागू करण्यात आलेली ही भाडेवाढ १५ जूनला संपणार होती. मात्र, डिझेलच्या वाढत्या किंमती, कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यातील वाढ आणि महामंडळावरील आर्थिक ताण लक्षात घेऊन वाढीव दर कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे साधी आणि मिडी बससेवांसाठी प्रति टप्पा दर ११.०५ रुपये राहणार असून प्रौढांसाठी किमान भाडे १४ रुपये आणि मुलांसाठी ७ रुपये कायम राहणार आहे.

महागाईच्या झळा सहन करणाऱ्या सामान्य प्रवाशांना आता वाढीव एसटी भाड्याचा भार आणखी एक महिना सोसावा लागणार आहे. राज्यभरातील लाखो प्रवासी दररोज एसटीवर अवलंबून असल्याने या निर्णयाचा थेट परिणाम ग्रामीण आणि मध्यमवर्गीय प्रवाशांच्या खिशावर होणार आहे. महामंडळाच्या आर्थिक स्थितीला दिलासा देण्यासाठी हा निर्णय घेतल्याचा दावा प्रशासनाने केला असला, तरी प्रवासी संघटनांकडून नाराजी व्यक्त होण्याची शक्यता आहे.

राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) उन्हाळी गर्दीच्या हंगामात प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन "परिवर्तनशील भाडे" लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या हंगामात १० टक्के प्रवासी तिकीट दरवाढ केली आहे. त्यामुळे प्रत्येक टप्प्यात प्रवाशांना १२ रुपये मोजावे लागतील. ही भाडेवाढ १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत लागू राहणार असून या कालावधीत साध्या बससेवांसाठी प्रवाशांना वाढीव भाडे मोजावे लागणार आहे.

### डिझेल दरवाढीचा मोठा फटका

एसटी महामंडळाला दररोज सुमारे १०.८७ लाख लिटर डिझेल लागते. राज्यातील डिझेलचा दर सध्या ९७.८३ ते ९९.५० रुपये प्रति लिटर दरम्यान असून त्यात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परिणामी महामंडळाला दररोज ३३ लाख रुपयांहून अधिक अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. हा आर्थिक भार महिन्याला १० कोटी रुपये तर वर्षभरात तब्बल १२४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल असा अंदाज आहे.

उन्हाळी सुट्ट्यांमध्ये गावाला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे या काळात बससेवांवर अतिरिक्त ताण येतो. या पार्श्वभूमीवर महसूल वाढवणे आणि सेवा सुरळीत ठेवणे यासाठी परिवर्तनशील भाडे लागू केली आहे. या योजनेअंतर्गत, बसच्या प्रवासी मागणी आणि मार्गानुसार भाड्यात वाढ केली जाणार आहे. मात्र, मासिक, त्रैमासिक व विद्यार्थी पासधारकांना या भाडेवाढीतून वगळण्यात आले आहे. तसेच, काही विशेष योजना व सवलती यात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

### एप्रिलमध्येच ७६ कोटींचा तोटा

आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या एसटी महामंडळाला एप्रिल २०२६ महिन्यात सुमारे ७६ कोटी रुपयांचा तोटा झाला आहे. वाढत्या इंधन खर्चामुळे महसूल आणि खर्च यातील तफावत अधिक वाढत असल्याने भाडेवाढ कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

# “पक्ष फोडण्यापेक्षा भाजपाने स्वतःची मुलं मोठी करावीत”; शर्मिला ठाकरे

**महाईन्यूज । पुणे**

**राज्यात सध्या ‘ऑपरेशन टायगर’ची जोरदार चर्चा सुरू असून, याअंतर्गत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या खासदारांना फोडण्याचे प्रयत्न होत असल्याचे बोलले जात आहे. आगामी १९ जून रोजी शिवसेनेच्या स्थापनेला ६० वर्षे आणि २२ जून रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एकसंध शिवसेना फोडल्याच्या ऐतिहासिक घटनेला चार वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाला पुन्हा एकदा मोठे खिंडार पडणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. याच मुद्द्यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर कडक शब्दांत निशाणा साधला. राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित एका कार्यक्रमात पत्रकारांशी बोलताना त्यांनी विविध मुद्द्यांवर आपली मते मांडली.**



शर्मिला ठाकरे म्हणाल्या, “१२ वर्षांपूर्वी भाजप ज्या समस्यांसाठी रस्त्यावर उतरून आंदोलने करत होती, त्या समस्यांवर आता कोणी चकार शब्दही काढत नाही. काल आमच्याकडे दादरचे एक ज्युवेलर आले होते. ते कोकणातील असून मराठी आहेत. त्यांनी सांगितले की, सिंधुदुर्गातील चिपी विमानतळ सध्या बंद पडले आहे. आपल्या सर्वांच्या करांमधून (टॅक्स) गोळा झालेला पैसा खर्च करून ते विमानतळ बांधले गेले. या १२ वर्षांत देशात आणि राज्यात किती विमानतळे सुरू झाली आणि त्यातील किती बंद पडली, याची सविस्तर माहिती मी आता काढणार आहे.”

पुढे बोलताना त्यांनी वाढत्या विमानतळांवर आणि खर्चावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. “एक विमानतळ बांधायला साधारण ४० ते ५० हजार कोटी रुपयांचा खर्च येतो, असा दावा केला जातो. आता नवी मुंबईत विमानतळ झाले आहे; पुण्यात विमानतळ असूनही आता पुरंदरला नवीन विमानतळ होत आहे. मुळात एवढी हवाई दळणवळणाची गरज आहे कुठे?” असा सवाल त्यांनी केला.

यावेळी त्यांनी राज्यातील वाढत्या वृक्षतोडीवरूनही सरकारला धारेवर धरले. “आम्ही वृक्षारोपण करत असलो, तरीही ही झाडे मोठी व्हायला १०० वर्षे लागतात. परंतु, येथे १००-२०० वर्षे जुनी असलेली झाडे सर्रास कापली जात आहेत. परिणामी उकाडा वाढत असून पाऊसही लांबला आहे. या सत्ताधाऱ्यांनी स्वतःची मुले तर परदेशात (फॉरेनला) सेटल केली आहेत, मग इथल्या पर्यावरणाचे त्यांना काय पडले आहे?” असा संतप्त सवाल त्यांनी केला.

पत्रकारांनी ‘ऑपरेशन टायगर’विषयी विचारले असता शर्मिला ठाकरे म्हणाल्या, “त्यांना (सत्ताधाऱ्यांना) फक्त पक्ष फोडण्याचीच कामे करायची आहेत. दुसऱ्यांची मुले (कार्यकर्ते) चोरण्यापेक्षा भारतीय जनता पक्ष आणि आरएसएसमध्ये अनेक वर्षे प्रामाणिकपणे काम करणारी चांगली मुले आहेत, त्यांना संधी का दिली जात नाही? त्यांनी फक्त आयुष्यभर सतरंज्याच उचलायच्या का? त्यांनी तिकडे ममता बॅनर्जींचा पक्ष फोडला, इथे उद्धव ठाकरेंचा फोडला, शरद पवारांचा पक्ष फोडला. आम्ही कधीही कोणाचा पक्ष फोडला नाही; उलट आम्ही आमची नवीन नेतृत्वे, नवीन मुले निर्माण केली. पक्षात जी चांगली मुले असतात, त्यांना तुम्ही मोठे केले पाहिजे.”

### मातोश्रीच्या बैठकीतील खासदारांच्या गैरहजेरीवर भाष्य

शिवसेनेच्या (उबाठा) ‘मातोश्री’वरील बैठकीला काही खासदार गैरहजर असल्याच्या मुद्द्यावर बोलताना शर्मिला ठाकरे म्हणाल्या, “प्रत्येकाच्या घरी काही ना काही वैयक्तिक कार्यक्रम असू शकतात. पाच खासदार गैरहजर होते म्हणजे ते पक्ष सोडून गेले असा त्याचा अर्थ होत नाही; आणि जे बैठकीला हजर होते, ते कधीच जाणार नाहीत असेही सांगता येत नाही. मला याचा चांगला अनुभव आहे. माझ्या स्वतःच्या पक्षातील लोक जेव्हा जाणार असतात, तेव्हा मी फोन केल्यावर म्हणतात, ‘वहिनी, मी इथेच आहे’ आणि असे बोलून दुसऱ्याच मिनिटाला ते दुसऱ्या पक्षात गेलेले असतात.” शेवटी सत्ताधाऱ्यांना आव्हान देताना त्या म्हणाल्या, “तुम्ही गेली १२ वर्षे सत्तेत आहात, मग आता स्वतःचे आमदार-खासदार निर्माण करून दाखवा. तेवढी हिंमत तरी दाखवा. तुम्ही देशाची आणि देशाच्या अर्थव्यवस्थेची वाट लावली आहे; किमान तुमच्या पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना तरी मोठे करा.”

# आम्ही तडजोड करणार नाही!

## अमेरिका-इराण शांतता कराराला इस्रायलचा तीव्र विरोध का?

महाईन्यूज । इराण

**अमेरिका आणि इराण यांच्यात होणाऱ्या आगामी शांतता कराराचे जगभरात स्वागत होत असतानाच, इस्रायलने मात्र या करारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "हा करार आमच्यावर बंधनकारक नाही," अशी भूमिका घेत इस्रायलने आपल्या सुरक्षेच्या मुद्द्यावर कोणतीही तडजोड करण्यास स्पष्ट नकार दिला आहे. स्वित्झर्लंडमध्ये येत्या शुक्रवारी या शांतता करारावर स्वाक्षऱ्या होणार आहेत, परंतु त्यापूर्वीच इस्रायलमधील सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांनी याविरोधात आवाज उठवला आहे.**



चालू वर्षात २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या संयुक्त हल्ल्यानंतर पश्चिम आशियात मोठ्या युद्धाचा भडका उडाला होता. गेल्या तीन महिन्यांत इराणने अमेरिकेच्या लष्करी तळांवर केलेल्या हल्ल्यांमुळे संपूर्ण आखाती देश या संघर्षात ओढले गेले. याच काळात इस्रायल आणि लेबनॉनमधील 'हिजबुल्लाह' संघटनेमध्येही पुन्हा युद्ध सुरू झाले. गेल्या काही वर्षांत इस्रायलने २०२३ मध्ये हमास, २०२४ मध्ये हिजबुल्लाह, २०२५ मध्ये इराण आणि आता २०२६ मध्ये पुन्हा अमेरिका-इराण युद्धाच्या छायेत अनेक संघर्ष सोसले आहेत.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढाकार घेऊन तयार केलेला हा शांतता करार इस्रायलला मान्य नाही. इस्रायलचे राष्ट्रीय सुरक्षा मंत्री इतामार बेन-ग्विर यांनी 'X' (ट्विटर) वर लिहिले, "ट्रम्प यांचा करार आमच्यावर बंधनकारक नाही. इस्रायल हा अमेरिकेचा मांडलिक नसून एक स्वतंत्र आणि सार्वभौम देश आहे. आम्ही 'बनाना रिपब्लिक' नाही." हिजबुल्लाहचे पूर्ण उच्चाटन झाल्याशिवाय आणि सैन्याने ताब्यात घेतलेल्या सीमावर्ती भागातून मागे न हटता शांतता पाळली जाणार नाही, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

तसेच, अर्थमंत्री बेझलेल स्मोट्रिच यांनी हा करार इस्रायल आणि मुक्त जगासाठी घातक असल्याचे म्हटले आहे. इराणला अण्वस्त्र सज्ज होण्यापासून रोखण्यासाठी इस्रायलला स्वतःच्या मार्गाने प्रयत्न सुरू ठेवावे लागतील, असा इशारा त्यांनी दिला. संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी स्पष्ट केले की, दबाव असला तरी इस्रायली सेना लेबनॉन, सीरिया आणि गाझा पट्टीतून मागे हटणार नाही.

### विरोधकही सरकारवर नाराज

या मुद्द्यावर इस्रायलमधील विरोधी पक्षही आक्रमक झाला आहे, मात्र त्यांनी पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या अपयशावर बोट ठेवले आहे. विरोधी पक्षनेते याइर लॅपिड यांनी म्हटले की, जर हा करार झाला, तर ते इस्रायलच्या परराष्ट्र आणि सुरक्षा धोरणाचे सर्वात मोठे अपयश असेल. तर दुसरीकडे, इस्रायली डेमोक्रॅटिक पक्षाचे नेते याइर गोलन यांनी आरोप केला की, आमच्या सैनिकांनी रक्ताचे पाणी करून मिळवलेले यश नेतन्याहू यांच्या कमकुवत आणि एकाकी धोरणामुळे धुळीस मिळाले आहे.

## बिस्किटाचे आमिष दाखवून ३ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार

महाईन्यूज । तामिळनाडू

**तमिळनाडूतील तिरुवल्लूर जिल्ह्यातून एक मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. एका ३ वर्षांच्या चिमुरडीला बिस्किटाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करण्यात आला, ज्यामध्ये उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी बिहारमधील एका परप्रांतीय मजुराला अटक केली आहे.या धक्कादायक घटनेनंतर तामिळनाडूमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, कायदा व सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांनी मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय आणि त्यांच्या 'टीव्हीके' सरकारला धारेवर धरले आहे.**



'हिंदुस्तान टाइम्स' या वृत्तसंस्थेने प्रसिद्ध वृत्तानुसार, पीडित मुलगी आणि आरोपी दोघेही मूळचे बिहारचे रहिवासी आहेत. पीडितेचे कुटुंब तिरुवल्लूर जिल्ह्यातील गुम्मिडीपुंडी येथील 'सिपकोट' औद्योगिक वसाहतीमध्ये राहत होते. रविवारी आरोपीने चिमुरडीला बिस्किटाचे आमिष दाखवून निर्जन ठिकाणी नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. मुलगी बेपत्ता झाल्यानंतर शोध घेतला असता, ती झुडपात गंभीर जखमी अवस्थेत आढळली. तिला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र सोमवारी उपचारादरम्यान तिचा दुर्दैवी मृत्यू झाला.

स्थानिक नागरिकांनी आरोपीला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. या घटनेत एकाच व्यक्तीचा सहभाग असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. सुरुवातीला पोलिसांनी पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता, मात्र आता मुलीच्या मृत्यूनंतर यामध्ये हत्येचे कलम जोडण्यात आले आहे.

मुख्यमंत्री विजय यांनी काही दिवसांपूर्वीच महिलांच्या सुरक्षेसाठी 'सिंगापेन स्पेशल फोर्स' सुरू करण्याची घोषणा केली होती. या घोषणेनंतर अवघ्या काही दिवसांतच ही घटना घडल्याने विरोधक आक्रमक झाले आहेत.

"तमिळनाडूमध्ये महिलांची सुरक्षा कुठे आहे? पोलिसांचा धाक उरलेला नाही. मुख्यमंत्र्यांचा कारभार म्हणजे निव्वळ देखावा आहे. तुमची 'सिंगापेन' विशेष तुकडी आता कुठे गेली? कायदा व सुव्यवस्था सुधारण्यावर सरकारने तात्काळ भर दिला पाहिजे." अशी प्रतिक्रिया अण्णाडीएमके सरचिटणीस एडापड्डी के. पलानीस्वामी यांनी दिली.

तसेच के. अन्नामलाई यांनीही या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत, राज्यातील गुन्हेगारीच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्याची मागणी सरकारकडे केली आहे. या घटनेमुळे संपूर्ण तमिळनाडू राज्यात संतापाची लाट पसरली आहे.

### रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल

"या घटनेमुळे मला तीव्र धक्का बसला आहे. तमिळनाडूतील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. मुख्यमंत्री विजय यांनी निवडणुकीत मतांसाठी लहान मुलांचा वापर केला, पण आता ते मुलांची सुरक्षा करण्यात अपयशी ठरले आहेत. सरकारने तातडीने कडक पावले उचलली नाहीत, तर 'डीएमके' रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल." अशा कडक शब्दांत विरोधी पक्षनेते, डीएमके उदयनिधी स्टालिन यांनी प्रतिक्रिया दिली.

# संचिता उगलेची आत्महत्या



अभिनेत्री संचिता उगले हिने वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी आत्महत्या केली आहे. नालासोपारा येथील घरात कोणी नसताना संचिताने छताच्या पंख्याला साडीने गळफास लावून आपले जीवन संपवले. ही घटना रविवारी संध्याकाळी ६:३० ते ७:३० च्या सुमारास घडली. संचिता नालासोपारा येथील आचोले पोलीस ठाण्याच्या हद्दीत आपले आई-वडील आणि बहिणीबरोबर राहत होती. ही घटना घडली तेव्हा ती घरात एकटीच होती. संचिताने बेडरुममध्ये छताच्या पंख्याला साडीने गळफास लावून आत्महत्या केली. पोलिसांना घटनास्थळी कोणतीही सुसाईड नोट मिळालेली नाही. सध्या पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. संचिता आपली आई-वडील आणि १५ वर्षांच्या लहान बहिणीबरोबर राहत होती. रविवारी संध्याकाळी ५:३० च्या सुमारास तिची लहान बहीण अंजली काही कामासाठी घराबाहेर गेली होती. घरात कोणीही नसताना संचिताने हे टोकाचं पाऊल उचललं.




## ‘लेडी सुपरस्टार’ अभिनेत्रीची होणार एन्ट्री

सिनेमात राघव लॉरेन्सनेच मुख्य भुमिका साकारली होती. या सिनेमात अभिनयासह दिग्दर्शनही त्यानेच केले होते. सिनेमाने बॉक्स ऑफिसवरही भरघोस कमाई केली होती ‘कंचना ४’ मध्ये अभिनेता राघव लॉरेन्स मुख्य भूमिका साकारणार आहे. सोबतच याया कथेमध्ये एक नवा ट्विस्ट आणण्यासाठी सिनेमाची लेडी सुपरस्टार सज्ज झाली आहे. याआधी चित्रपटात पूजा हेगडे तसेच नोरा फतेही यांची वर्णी लागल्याच्या चर्चा होत्या. परंतु, आता या चित्रपटात आणखी एका लेडी सुपरस्टारची एन्ट्री झाल्याचं बोललं जात आहे.



# सुरभी ज्योती पुन्हा चर्चेत

लोकप्रिय टीव्ही मालिका नागीण ३ मधून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री सुरभी ज्योतीच्या घरी आनंदाचं वातावरण आहे. वयाच्या ३८ व्या वर्षी सुरभी पहिल्यांदाच आई झाली असून तिने एका गोंडस मुलीला जन्म दिला आहे. ही आनंदाची बातमी समोर येताच चाहते आणि सेलिब्रिटींकडून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. १३ जून २०२६ रोजी सुरभी ज्योती आणि तिचा पती सुमित सुरी यांच्या घरी चिमुकल्या परीचं आगमन झालं. या आनंदाच्या बातमीमुळे त्यांच्या चाहत्यांमध्ये उत्साहाचं वातावरण पाहायला मिळत आहे. आई होण्याचा प्रवास प्रत्येक महिलेसाठी खूप खास असतो आणि सुरभीनेही हा सुंदर प्रवास आपल्या चाहत्यांसोबत शेअर केला होता. गरोदरपणात तिने सोशल मीडियावर अनेक खास मॅटर्निटी फोटोशूटचे फोटो पोस्ट केले होते. त्यापैकी तिच्या व्हिंटेज स्टाईल फोटोशूटची विशेष चर्चा रंगली होती. या फोटोशूटमध्ये सुरभीने पोलका डॉट डिझाइनचा आकर्षक वनपीस ड्रेस परिधान केला होता. तिचा हा साधा पण स्टायलिश लूक चाहत्यांच्या पसंतीस उतरला होता. या लूकला अधिक उठावदार बनवण्यासाठी तिने गळ्यात मोत्यांची माळ घातली होती. तसेच डोक्यावर काळ्या रंगाची नेट फॅब्रिकची कॅप आणि हातात नेटचे ग्लोव्हज परिधान केले होते. त्यामुळे तिच्या संपूर्ण लूकला एक वेगळीच व्हिंटेज झलक मिळाली होती. फोटोंमध्ये तिच्या चेहऱ्यावरचा गरोदरपणाचा नैसर्गिक ग्लो स्पष्टपणे दिसून येत होता. तिचं हास्य, आत्मविश्वास आणि आनंद चाहत्यांच्या विशेष पसंतीस उतरला.आई झाल्याची बातमी समोर आल्यानंतर सोशल मीडियावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला आहे. चाहत्यांसह अनेक कलाकारांनीही सुरभी आणि सुमित यांना शुभेच्छा दिल्या आहेत. सुरभी ज्योती ही हिंदी दूरचित्रवाणी विश्वातील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. ‘नागीण ३’सह अनेक मालिकांमधील तिच्या भूमिकांना प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिलं आहे. आता तिच्या आयुष्यात एका नव्या भूमिकेची म्हणजेच आईपणाची सुरुवात झाली आहे. सध्या तिचे मॅटर्निटी फोटो आणि आई झाल्याची आनंदाची बातमी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चेत आहेत. चाहतेही तिच्या या नव्या प्रवासासाठी भरभरून शुभेच्छा देत आहेत.



# वैभवच्या बॅटला लागलं ग्रहण?

## आयपीएल २०२६ च्या हंगामात धडाकेबाज फलंदाजी करणारा वैभव सूर्यवंशी आता भारतीय अ संघात

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आयपीएल २०२६ च्या हंगामात धडाकेबाज फलंदाजी करणार वैभव सूर्यवंशी आता भारतीय अ संघाकडून खेळतोय. भारतीय अ संघ सध्या श्रीलंकेत ट्राय सिरीज खेळत असून इथं आतापर्यंत तीन सामन्यात वैभव सूर्यवंशीची बॅट जशी तळपायला पाहिजे होती तशी तळपलेली नाही. आजच्या सामन्यात देखील वैभव सूर्यवंशी १४ चेंडूत २१ धावा करून बाद झाला. पुन्हा एकदा वैभव मोठी खेळी करण्यात अपयशी ठरला.**



### चांगली सुरूवात

वैभव सूर्यवंशी पहिल्या चेंडूपासून चाचपडतोय असं दिसत नाहीये. तो आपल्या इनिंगची धडाक्यात सुरूवात करतोय. मात्र त्याला मोठी खेळी करण्यात अपयश येत आहे. आयपीएलमध्ये त्याला व्यवस्थापनाने मुक्तपणे खेळण्याची मुभा दिली होती. जर तो त्याच फिअरलेस मोडमध्ये फलंदाजी करू लागला तर त्याला मोठं यश मिळवता येईल.मात्र टी २० क्रिकेट आणि वनडे क्रिकेटमध्ये काही फरक असतो. तसेच आयपीएलच्या पाटा खेळपट्ट्या आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गोलंदाजांना थोडी मदत मिळेल अशा खेळपट्ट्या असतात. त्यामुळं वैभवला म्हणावं तितकं यश मिळत नाहीये.

दांबुलाच्या मैदानावर सुरू असलेल्या आजच्या श्रीलंकेविरूद्धच्या सामन्यात वैभवने तीन चौकार आणि एक षटकार मारत दमदार सुरूवात केली. त्याने १४ चेंडूत २१ धावा केल्या. मात्र त्यानंतर श्रीलंकेचा कर्णधार सहान अराचिग याने त्याला आपल्या फिरकीच्या जाळ्यात खेचलं. वैभव सहानला मोठा फटका मारण्याच्या तयारीत होता. मात्र त्याला बॉल टाईम करता आला नाही. त्याने चेंडू थेट वानूजाच्या हातात मारला.

गेल्या काही सामन्यात वैभव सूर्यवंशीची कामगिरी त्याच्या लौकिकास साजेशी होत नाहीये. त्याने गेल्या तीन सामन्यात १४, ४४ आणि २१ धावा केल्या आहेत. आयपीएलमधील त्याची फलंदाजीची आकडेवारी आणि आताची आकडेवारी यात खूप फरक दिसत आहे.

आयपीएलमध्ये वैभव सूर्यवंशीने गोलंदाजांची यथेच्छ धुलाई केली होती. त्याने दिग्गजांचे चेंडू स्टेडियमच्या कोपऱ्या कोपऱ्यात पोहचलवले होते. भारताकडून खेळताना मात्र वैभवची कामगिरी खालावत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील दबाव हा वेगळा असतो. त्याचबरोबर श्रीलंका आणि अफगाणिस्तानच्या गोलंदाजांनी वैभव विरूद्ध चांगली रणनिती आखली होती. त्यांना वैभवचा उधळलेला वारू आवरण्यात यश आलं.

वैभव सूर्यवंशीच्या गुणवत्तेवर कोणताही आक्षेप नसून सतत धावा करण्यात अपयश आल्यामुळं संघ व्यवस्थापन आणि चाहत्यांमध्ये निराशा पसरते. त्यातच आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळपट्ट्या आयपीएलच्या तुलनेत थोड्या कमी पाटा असतात. त्यातच श्रीलंकेत खेळपट्टी सहसा फिरकीला साथ देणारी आणि चेंडू जुना झाल्यावर वेगवान गोलंदाजांना मदत करणार असते.

त्यामुळं चेंडू नवा असेपर्यंत वैभव तो चांगल्या प्रकारे क्लिअर करू शकतो. मात्र एखादा मिसटाईम झालेला चेंडू थेट फिल्डरच्या हातात जाण्याची शक्यता आहे. त्यामुळं वैभवनं आक्रमक खेळासोबतच फिल्ड प्लेसमेंट पाहून फटकेबाजी करणं देखील गरजेचं आहे.

याशिवाय वैभवने डावाची उभारणी करण्यावरही भर देणे आवश्यक आहे. सुरुवातीच्या काही षटकांमध्ये संयम राखून खेळल्यास मोठी खेळी करण्याची संधी त्याला मिळू शकते. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये प्रत्येक संघ फलंदाजांच्या कमकुवत बाजूंचा बारकाईने अभ्यास करून त्यानुसार रणनिती आखत असतो. त्यामुळे वैभवनेही परिस्थितीनुसार आपली फलंदाजी बदलत सातत्य राखणे गरजेचे आहे. त्याच्याकडे नैसर्गिक आक्रमकता आणि मोठे फटके खेळण्याची क्षमता आहे, मात्र त्याला संयमाची जोड मिळाल्यास तो अधिक प्रभावी ठरू शकतो. आगामी सामन्यांमध्ये मोठी खेळी करून टीकाकारांना उत्तर देण्याची आणि संघाचा विश्वास अधिक दृढ करण्याची संधी वैभवसमोर असेल.

## जिगरबाज जपानने बलाढ्य नेदरलँड्सला बरोबरीत रोखले; जर्मनीने डागले तब्बल ७ गोल

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**फिफा विश्वचषकातील रविवारी (दि. १४ जून) झालेल्या सामन्यांमध्ये तीन परस्परविरोधी खेळ पाहायला मिळाले. जपानने शेवटच्या क्षणी केलेल्या जिगरबाज खेळीने बलाढ्य नेदरलँड संघाला बरोबरीत रोखले. ह्युस्टनमध्ये, जर्मनीने कुरासाओचा धुव्वा उडवत 'गट ई' (GROUP E) मध्ये अव्वल स्थान पटकावले; तर दुसरीकडे, अमाद डियालोच्या निर्णायक गोलच्या जोरावर इक्वेडोरचा पराभव करून आयव्हरी कोस्टने बाद फेरीतील आपली आशा जिवंत ठेवली आहे.**



### जिगरबाज जपानने नेदरलँड्सला रोखले

जपानचा संघ फुटबॉल जगतात 'जायंट किलर' म्हणून ओळखला जातो. चार वर्षांपूर्वी कतारमध्ये झालेल्या विश्वचषकात जपानने गट फेरीत जर्मनी आणि स्पेनचा पराभव केला होता. २०१८ च्या विश्वचषकात त्यांनी कोलंबियाला धूळ चारली होती. गेल्या चार विश्वचषकांपैकी तीनमध्ये जपानने विश्वचषकाची सुरुवात विजयाने केली होती. रविवारी झालेल्या सामन्यात नेदरलँड्सविरुद्ध दोनदा पिछाडीवर पडल्यानंतरही जपानने जोरदार पुनरामगन केले. या सामन्यात दोन्ही संघांना पहिले ५० मिनिटे गोल करता आला नाही.

प्रथम व्हर्जिल व्हॅन डायकने हेडरद्वारे शानदार गोल करत नेदरलँड्सला १-० अशी आघाडी मिळवून दिली. हा आनंद अल्पकाळच टिकला. यानंतर अवघ्या सात मिनिटांनंतर केइतो नाकामुराने गोल करून जपानला बरोबरी साधून दिली. त्यानंतर क्रायसेन्सियो समरव्हिलने गोल करत नेदरलँड्सला २-१ असे पुढे नेले. आता जपानचा पराभव निश्चित वाटत असतानाच, सामन्याची नियमित वेळ संपण्यास अवघी दोन मिनिटे शिल्लक असताना दाइची कामादाने गोल करून जपानला २-२ अशी महत्त्वपूर्ण बरोबरी साधून दिली.

सामन्याच्या शेवटच्या क्षणी गोल करत जपानने नेदरलँड्सला बरोबरीत रोखल्यानंतर, मैदानाबाहेर जपानच्या चाहत्यांनी पुन्हा एकदा त्यांच्या एका खास सवयीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ती सवय म्हणजे सामना संपल्यानंतर स्टेडियममधील कचरा साफ करणे. सामना संपण्याच्या दोन मिनिटे आधी कामादाने गोल केल्यावर जपानी चाहत्यांनी निळ्या रंगाच्या कचऱ्याच्या पिशव्या हवेत उडवून जल्लोष केला होता. सामना संपताच त्यांनी त्याच पिशव्यांचा वापर करून स्टेडियममधील सर्व कचरा गोळा केला आणि आसनांची स्वच्छता केली. जपानी चाहत्यांनी स्टेडियम साफ करण्याचे हे दृश्य पहिल्यांदा १९९८ च्या फ्रान्स विश्वचषकादरम्यान जगासमोर आले होते. तेव्हापासून जपानचे चाहते प्रत्येक मोठ्या क्रीडा स्पर्धेत सामना संपल्यानंतर स्टेडियमची स्वतःहून स्वच्छता करण्याची आपली परंपरा अविरतपणे जपत आहेत.

सामन्याच्या शेवटच्या क्षणी गोल करत जपानने नेदरलँड्सला बरोबरीत रोखल्यानंतर, मैदानाबाहेर जपानच्या चाहत्यांनी पुन्हा एकदा त्यांच्या एका खास सवयीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ती सवय म्हणजे सामना संपल्यानंतर स्टेडियममधील कचरा साफ करणे. सामना संपण्याच्या दोन मिनिटे आधी कामादाने गोल केल्यावर जपानी चाहत्यांनी निळ्या रंगाच्या कचऱ्याच्या पिशव्या हवेत उडवून जल्लोष केला होता. सामना संपताच त्यांनी त्याच पिशव्यांचा वापर करून स्टेडियममधील सर्व कचरा गोळा केला आणि आसनांची स्वच्छता केली.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार ।
दि. 16 जून 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पिंपरी-चिंचवडवर भीषण पाणीसंकटाचे सावट

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणातील पाणीसाठा चिंताजनकरीत्या घटल्याने पिंपरी-चिंचवड शहरावर पाणीसंकटाचे सावट गडद झाले आहे. एल निनोच्या प्रभावामुळे मान्सून लांबल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली असून पाण्याची बचत करण्यासाठी शहरातील जलतरण तलाव आणि वॉशिंग सेंटर तात्काळ बंद करण्याचे आदेश महापौर रवी लांडगे यांनी दिले आहेत.

शहराला पवना, आंद्रा धरण तसेच एमआयडीसीमार्फत पाणीपुरवठा केला जातो. मात्र, यंदा अपेक्षित पाऊस न झाल्याने धरणांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. जून महिना अर्धा संपत आला तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. राज्य शासनाच्या जलसंपदा विभागानेही धरणांतील पाण्याचा वापर केवळ पिण्यासाठीच करावा, असे निर्देश दिले आहेत.

पवना धरणात सध्या केवळ २१ टक्के पाणीसाठा शिल्लक असून परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शहरात आधीच पाणीगळतीमुळे अनेक भागांत एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. त्यातच

> “ गतवर्षी यावेळी धरणांमध्ये चांगला पाणीसाठा होता. आता पवना धरणामध्ये अवघा २१ टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे पाणी जपून वापरणे आवश्यक आहे. पाऊस नाही पडला तर शहरातील पाणीपरिस्थिती आणखी बिघडू शकते. त्यामुळे जलतरण तलाव, वाशिंग सेंटर बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
>
> - रवि लांडगे, महापौर.

पाऊस आणखी लांबल्यास नागरिकांना पाणीकपातीला सामोरे जावे लागू शकते. पाण्याचा अनावश्यक वापर टाळण्यासाठी महापालिका प्रशासनाने विविध उपाययोजनांना सुरुवात केली आहे. त्याअंतर्गत जलतरण तलाव आणि वाहन धुण्याची केंद्रे बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच नागरिकांनी पाणी जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय टाळावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, शहरातील नागरिकांनीही पाण्याचा अपव्यय टाळून पाणी बचतीसाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे. पावसाने लवकर हजेरी न लावल्यास शहरासमोरील पाणीटंचाईचे संकट आणखी गडद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026




DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.
It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.

UG/PG Programs
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# विकास आराखडा समितीवर सारिका गायकवाड

## पिंपरी-चिंचवड शहर नियोजन प्रक्रियेत महत्त्वाची सारिका गायकवाड यांची भूमिका

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या आगामी २० वर्षांच्या विकासाची दिशा ठरवणाऱ्या 'शहर विकास आराखडा नियोजन समिती'वर (City Development Plan Committee) नगरसेविका सारिका गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले असून, शहराच्या दीर्घकालीन विकास नियोजनात स्थानिक लोकप्रतिनिधींना महत्त्वाची संधी मिळाल्याचे मानले जात आहे.**



भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आल्याची माहिती असून, शहराच्या नियोजन प्रक्रियेत अनुभवी आणि सक्रिय महिला लोकप्रतिनिधींचा सहभाग वाढल्याचे यानिमित्ताने अधोरेखित झाले आहे. महापालिका सर्वसाधारण सभेत या नियुक्तीला मान्यता देण्यात आली.

### महेश लांडगे यांचे मार्गदर्शन

शहराच्या शाश्वत विकासासाठी आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली विकास आराखडा प्रक्रियेला गती मिळत आहे. नागरिकांच्या सूचना, स्थानिक समस्यांचा विचार करून पारदर्शक व सर्वसमावेशक आराखडा तयार करण्यावर भर दिला जाणार असून, नगरसेविका सारिका गायकवाड यांच्या समावेशामुळे महिलांचे प्रतिनिधित्वही अधिक बळकट होणार आहे. यामुळे शहराच्या भविष्यातील विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

"पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यासाठी ही नियुक्ती माझ्यासाठी एक मोठी जबाबदारी आहे. आमदार महेश लांडगे यांचे आभार व्यक्त करते. पुढील २० वर्षांचा विचार करून शहराला जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा, शाश्वत विकास आणि नागरिककेंद्रित नियोजन देणे हेच माझे ध्येय असेल. प्रत्येक प्रभागातील नागरिकांच्या अपेक्षा, समस्या आणि सूचना यांना केंद्रस्थानी ठेवून पारदर्शक आणि परिणामकारक विकास आराखडा तयार करण्यासाठी मी पूर्णपणे कटिबद्ध आहे.

**- सारिका गायकवाड, नगरसेविका, भाजपा.**

### महिलांचा सक्रिय सहभाग

शहराचा वाढता विस्तार, लोकसंख्येचा वेग आणि नागरी सुविधांवरील वाढता ताण लक्षात घेता दीर्घकालीन विकास आराखडा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. अशा महत्त्वपूर्ण समितीत नगरसेविका सारिका गायकवाड यांना संधी मिळाल्याने स्थानिक प्रश्न, नागरिकांच्या अपेक्षा आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय वास्तव यांचा समतोल साधण्यास मदत होणार असल्याचे बोलले जात आहे. नगरसेविका म्हणून कार्यरत असताना सारिका गायकवाड यांनी आपल्या प्रभागातील पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते विकास आणि नागरी समस्यांवर सातत्याने काम केले आहे. या प्रत्यक्ष अनुभवाचा उपयोग आता शहराच्या व्यापक विकास आराखड्यात केला जाणार असून, नियोजन प्रक्रियेत स्थानिक पातळीवरील वास्तव अधिक प्रभावीपणे मांडले जाण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पिंपळे सौदागरमध्ये शत्रुघ्न काटे यांच्या पुढाकाराने नागरिकांना मोफत NCMC कार्डांचे वाटप

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**नागरिकांचा प्रवास अधिक डिजिटल, सुलभ आणि गतीमान व्हावा या उद्देशाने उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने पिंपळे सौदागर येथे १००० नागरिकांना मोफत NCMC (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) वाटप करण्यात आले. रविवार, १४ जून २०२६ रोजी फाउंडेशनच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेला हा विशेष उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.**




या कार्यक्रमास उद्योजक विजयशेठ जगताप यांच्यासह आपल्या विशेष उपस्थितीत लाभार्थ्यांना NCMC कार्डांचे वितरण करण्यात आले. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसेस, मेट्रो तसेच स्थानिक बस सेवांमध्ये उपयोगी ठरणारे हे कार्ड नागरिकांना मोफत उपलब्ध करून दिल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

'नागरिकांसाठी डिजिटल व सुलभ प्रवास व्यवस्थेकडे एक महत्त्वपूर्ण पाऊल' या संकल्पनेतून उन्नती सोशल फाउंडेशनने हा भव्य कॅम्प आयोजित केला होता. वाढत्या डिजिटल युगात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिक प्रभावी वापर करता यावा आणि नागरिकांना आधुनिक सुविधांचा लाभ मिळावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी उन्नती सोशल फाउंडेशनच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. "उन्नती सोशल फाउंडेशन आणि सौ. कुंदाताई भिसे यांनी नेहमीच पिंपळे सौदागरमधील नागरिकांच्या गरजा ओळखून तंत्रज्ञानाधारित आणि जनोपयोगी उपक्रम राबवले आहेत. हा उपक्रम शहरातील इतर भागांसाठीही प्रेरणादायी व आदर्श ठरेल," असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

या प्रसंगी नगरसेविका सौ. कुंदाताई भिसे, नगरसेविका सौ. अनिताताई काटे, पवना सहकारी बँकेचे संचालक श्री जयनाथशेठ काटे, श्री संजयशेठ भिसे, श्री कैलासशेठ कुंजीर, पिंपळे सौदागरमधील विविध ज्येष्ठ नागरिक संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच परिसरातील नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या उपक्रमामुळे नागरिकांना आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेशी जोडण्यास मदत होणार असून डिजिटल व्यवहारांना चालना मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



"आजच्या डिजिटल युगात नागरिकांना आधुनिक सुविधांशी जोडणे ही काळाची गरज आहे. उन्नती सोशल फाउंडेशनने १००० नागरिकांना मोफत NCMC कार्ड उपलब्ध करून देत डिजिटल आणि सुलभ प्रवासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या कार्डमुळे नागरिकांना एसटी, मेट्रो आणि स्थानिक बससेवांचा वापर अधिक सोयीस्कर पद्धतीने करता येणार आहे. नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन राबविण्यात आलेला हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असून शहरातील इतर भागांसाठीही प्रेरणादायी ठरेल."

**- शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.**

# पिंपरी-चिंचवडच्या विकासाचा 'रोडमॅप' ठरणार!

## शहर विकास आराखडा समितीवर स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांची निवड

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या आगामी २० वर्षांतील विकासाची दिशा आणि चेहरामोहरा ठरवणाऱ्या अत्यंत महत्त्वपूर्ण 'शहर विकास आराखडा समिती'वर (City Development Plan Committee) महापालिकेचे स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले.**



महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले. चिंचवड विधानसभेचे आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली ही जबाबदारी सोपवण्यात आली असून, यामुळे शहराच्या नियोजन प्रक्रियेत सिव्हील इंजिनियर आणि दांडगा प्रशासकीय अनुभव असलेल्या नेतृत्वाला संधी मिळाली आहे, त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा फायदा शहर विकासाला होणार आहे.

### स्थायी समिती सभापती म्हणून अनुभवाचा फायदा

अभिषेक बारणे सध्या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती म्हणून यशस्वीरीत्या जबाबदारी सांभाळत आहेत. महापालिकेचा मुख्य आर्थिक कणा असलेल्या स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांना शहराच्या अर्थसंकल्पीय तरतुदी आणि विविध विकासकामांच्या अंमलबजावणीचा थेट अनुभव आहे. ९ हजार कोटींहून अधिक रकमेचा अर्थसंकल्प हाताळण्याचा त्यांचा हा अनुभव आता शहराच्या भौतिक आणि धोरणात्मक नियोजनात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. विशेषतः विकास आराखड्यातील प्रकल्पांसाठी निधीची तरतूद करणे यामुळे अधिक सुलभ होणार आहे.

> "पिंपरी-चिंचवड हे देशातील सर्वाधिक वेगाने विकसित होणारे शहर आहे. आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली माझ्यावर ही मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. स्थायी समितीचा सभापती म्हणून काम करताना मला शहराच्या आर्थिक आणि नागरी गरजांची जवळून ओळख झाली आहे. आता विकास आराखडा समितीच्या माध्यमातून शहराचा पुढील २० वर्षांचा विचार करून शाश्वत आणि पारदर्शक नियोजन करण्याला माझे प्राधान्य असेल. सर्वसामान्यांच्या हिताचा आणि शहराच्या वैभवात भर घालणारा 'आदर्श' आराखडा तयार करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत.
>
> - **अभिषेक बारणे,** स्थायी समिती सभापती,
> पिंपरी चिंचवड महापालिका.

### लोकसहभागातून आदर्श आराखडा

शहर विकास आराखडा (DP) हा केवळ शासकीय दस्तावेज न राहता तो थेट जनतेच्या हिताचा असावा, यासाठी लोकसहभागावर विशेष भर दिला जाणार आहे. शहरातील विविध सामाजिक संस्था, तज्ज्ञ, वास्तूविशारद आणि सर्वसामान्य नागरिकांनी मांडलेल्या प्रत्येक विधायक सूचनेचा आणि हरकतीचा या समितीमध्ये आदर केला जाईल. नवीन आराखडा अंतिम करताना पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार आहे. आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन आणि नागरिक यांच्यात समन्वयाचा दुवा म्हणून ही समिती काम करेल. नागरिकांच्या अपेक्षा समजून घेऊनच पिंपरी-चिंचवडच्या उज्ज्वल भविष्याचा अंतिम नकाशा तयार केला जाईल, असा विश्वास बारणे यांनी व्यक्त केला आहे.

---

## महापालिकेला कायदेशीर नोटीस; अन्यथा उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करू

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभा, स्थायी समिती तसेच विशेष सभांचे थेट प्रक्षेपण (लाईव्ह टेलिकास्ट) अचानक बंद करण्यात आल्याच्या निर्णयाविरोधात नगरसेवक संदीप वाघेरे यांनी महापालिका प्रशासनाला कायदेशीर नोटीस बजावली असून, "१५ दिवसांत निर्णय न घेतल्यास मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका (PIL) दाखल करू," असा थेट इशारा दिला आहे.**



पिंपरी येथे सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत ज्येष्ठ विधिज्ञ अॅड. असीम सरोदे आणि नगरसेवक संदीप वाघेरे यांनी ही माहिती दिली. महापालिकेच्या महत्त्वाच्या बैठका नागरिकांसाठी ऑनलाईन थेट प्रसारित करणे हे लोकशाही आणि पारदर्शक प्रशासनाच्या दृष्टीने आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या वतीने पाठविण्यात आलेल्या नोटिशीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ तसेच राज्य शासनाच्या डिजिटल प्रशासन व पारदर्शकतेसंदर्भातील धोरणांचा आधार घेत, सभांचे थेट प्रक्षेपण तातडीने पुन्हा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्याच बरोबर स्थायी समिती बैठकांचे लाईव्ह प्रक्षेपण जनतेला दाखवावे असेही वाघेरे यांनी म्हटले आहे.

यासोबतच यापूर्वी झालेल्या सर्वसाधारण सभा, स्थायी समिती व विशेष सभांचे व्हिडिओ संग्रहित करून नागरिकांना सहज उपलब्ध करून देण्याचीही मागणी करण्यात आली आहे. नागरिकांना लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या कामकाजाची माहिती मिळणे हा त्यांचा मूलभूत लोकशाही अधिकार असल्याचा दावा नोटिशीत करण्यात आला आहे. नोटिशीत प्रशासनाला १५ दिवसांची मुदत देण्यात आली असून, या कालावधीत सकारात्मक निर्णय न झाल्यास मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येईल, असा इशारा नगरसेवक संदीप वाघेरे यांनी पत्रकार परिषदेत दिला.

महापालिकेच्या सभांचे लाईव्ह प्रक्षेपण बंद झाल्यानंतर नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांकडून नाराजी व्यक्त होत असताना, या कायदेशीर नोटिशीमुळे प्रशासनावर मोठा दबाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या कायदेशीर नोटिशीवर अॅड. असीम सरोदे, अॅड. श्रिया आवळे, अॅड. तृप्ती गायकवाड आणि अॅड. आर्या राजे भोसले यांच्या स्वाक्षऱ्या असून, नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या वतीने ही कार्यवाही करण्यात आल्याचे सांगण्यात आले.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway
Station